# अटल बिहारी वाजपेयी यांची तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची कार्यकींद

**प्रा. डॉ. उमेशकुमार पी. शहारे**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा रासेयो प्रमुख)
स्व.नि.पा.वाघाये महा. लाखनी, जि. भंडारा
मो. नंबर - 9850227762, 8080475973
ई.मेल- kanchanumesh358@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

लेखक व कवी हृदयाचे व लोकनेते असा नावलौकिक असलेले श्री अटल बिहारी वाजपेयी हे भारताचे तीन वेळा पंतप्रधान राहिले होते. त्यांनी पहिल्यांदा १६ मे १९९६ रोजी पंतप्रधान पदाची शपथ घेऊन १३ दिवसाच्या थोडया काळासाठी पंतप्रधान म्हणून काम पाहिले होते. पुन्हा १९ मार्च १९९८ रोजी ते भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाले. परंतु काही कारणास्तव १३ महिन्यातच त्यांच्या पक्षाचे ससरकार कोसळले होते. तरीही १९९९ च्या सार्वत्रिक निडणुका होईपर्यंत काळजीवाहू पंतप्रधान म्हणून त्यांची निवड झाली होती. सप्टेंबर-ऑक्टोंबर १९९९ च्या सार्वत्रिक निवडणुकानंतर १३ ऑक्टोंबर १९९९ रोजी त्यांनी सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधान पदाची सुत्रे स्विकारली. पंडीत नेहरूनंतर सलग दोनदा पंतप्रधान होणारे ते पहिले पंतप्रधान ठरले होते.

जेष्ठ संसद पटू असलेले श्री अटल बिहहरी वाजपेयी चार दशक राजकारणात सक्रीय होते. श्री वाजपेयी नऊ वेळा लोकसभेवर तर दोन वेळा राज्यसभेवर निवडून आले होते. हाही एक प्रकारचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या अंतर्गत व परीकीय धोरणास आकार देण्यास एक प्रतप्रधान, परराष्ट्रमंत्री, विविध स्थायी समित्यांचे अध्यक्ष व एक विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी समर्थपणे भूमिका बजावली होती. अटल बिहारी वाजपेयी यांचा सामाजिक जीवनातील उदय हा भारतीय लोकशाही आणि त्यांच्या कुशाग्र राजकीय बुद्धिमत्तेचा गौरव आहे. उदारमतवादी जागतिक दृष्टीकोन व लोकशाही तत्वांशी असलेली बांधिलकी यामुळे जनसामान्यांच्या मनयात त्यांच्याबद्दल आदर आहे. भारताप्रती असलेले त्यांचे निस्वार्थ समर्पण व पन्नास वर्षाहून अधिक काळ देशासाठी दिलेल्या निस्पृह सेवेबद्दल त्यांना भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला पद्मविभूषण २५ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रपती व्यंकटरमन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. १९९४ साली उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कारही असलेल्या भारतरत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या कारकिर्दीची, योगदानाची माहिती पुढीलप्रमाणे -

**जीवनपरिचय :-**

२५ डिसेंबर १९२४ साली तत्कालीन ग्वालियर संस्थानात (आताच्या मध्यप्रदेश राज्यात) एका प्राथमिक शिक्षकाच्या घरात त्यांचा जन्म झाला होता. त्यांनी ग्वालियर येथील व्हिक्टोरीया महाविद्यालयात आताचे (राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय) येथून पदवी (बि.ए.) चे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यानी एम.ए. राज्यशास्त्र आणि कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी कानपूर येथील डी.ए.वी. महाविद्लयात प्रवेश घेतला. येथून त्यांनी एम.ए.राज्यशास्त्र या विषयाची पदवी संपादन केली. कायद्याचे शिक्षण अपूर्ण सोडून त्यांनी देश सेवेला वाहून घेतले.

श्री. वाजपेयी पंधरा वर्षाचे असतांनाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाऊ लागले. आणि काही काळातच ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रीय कार्यकर्ते झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील शिबिरांच्या ठिकाणी त्यांनी म्हटलेली कविता 'हिंदू तन-मन, हिंदू जीवन रग रग हिंदू मेरा परिचय' ही खुपच प्रसिद्ध झाली होती. राज्यशास्त्र व कायद्याचे विद्यार्थी असलेल्या श्री वाजपेयींना शालेय काळातच भाषणाची, वत्कृत्वाची आणि परकिय व्यवहारामध्ये रूची निर्माण झाली होती. त्यांनी ही आवड पुढे अनेक वर्षे जोपासली व विविध व्दिपक्षीय व बहुपक्षीय व्यासपिठावर भारताचे प्रतिनिधीत्व करतांना त्यांनी हया कौशल्याचा उपयोग केला.

**राजकीय प्रवासाची सुरूवात :-**

ब्रिटीश सत्तेला भारतातून पायउतार करण्यास महत्वाच्या ठरलेल्या १९४२ च्या भारत छोडो चळवळीत सहभागी होवून त्यांनी विद्यार्थी दशेतच राष्ट्रवादी राजकारणाचे धडे गिरविल्याचे दाखवून दिले. याच कालावधीत ते श्यामाप्रसाद मुखर्जी व भारतीय जनसंघाच्या संपर्कात आले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र होवून त्याचे भारत-पाकिस्तान असे विभाजन होवून दोन तुकडे झाले. तेव्हा अटल बिहारी वाजपेयींनी दुःखी अंतकरणाने 'स्वतंत्रता दिवस की पुकार' नावाची कविता रचली.

**१९९९ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून कारकिर्दीची सुरूवात :-**

१७ एप्रिल १९९९ मध्ये अटलबिहारी वाजपेयींनी बाराव्या लोकसभेतील अविश्वासाच्या ठरावानंतर आपल्या मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे निवडणूक आयोगाने तेराव्या लोकसभेसाठी निवडणूक जाहीर केली. निवडणूका होईपर्यंत काळजीवाहू सरकार म्हणून अटलबिहारी वाजपेयींची पंतप्रधान म्हणून निवड केली होती.

सप्टेंबर-ऑक्टोंबर १९९९ च्या तेराव्या लोकसभेच्या निवडणूकीत ४५ पक्षांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये सहा राष्ट्रीय आणि बाकीचे प्रादेशिक पक्ष होते. ५४३ जागांसाठी निवडणूका झाल्या. या निवडणूकीत भाजपाचे ३७० कलम रद्द करणे, राममंदीर बांधणे, वित्तीय सुधारणा या मुद्यांच्या आधारे प्रचार केला. त्याचबरोबर स्वदेशीचा पुरस्कार केला. 'कारगील युद्ध' आणि पोखरण मधील अणुचाचणी यामुळे भारतात वाजपेयी यांच्यावर जनतेची मोठी निष्ठा निर्माण झाली होती. हा मुद्दा हया निवडणूकीत भाजपाच्या बाजूने जमेचा होता.

दुसऱ्या बाजूला यावेळी काँगेसच्या अध्यक्षपदी श्रीमती 'सोनिया गांधी' यांची निवड झाली. त्याचवेळी शरद पवार, पी.ए.संगम्मा आणि तारीख अन्वर यांनी सोनिया गांधींच्या विरोधात विदेशी नागरिकत्वाचा मुद्दा मांडून बंडखोरी केली. आणि राष्ट्रवादी काँगेस पक्षाची स्थापना केली. हाच विदेशी नागरीकत्वाचा मुद्दा भाजपाने प्रचाराचा मुद्दा केला. ६ ऑक्टोंबर १९९९ रोजी निवडूकांचे निकाल जाहीर झाले. या निवडणूकीत अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २९८ जागा मिळाल्या. त्याचबरोबर द्रमुक, एम.डी.एम.के; तेलगु देसम, संयुत्क जनता दल यांच्या पाठिंब्यामुळे ३०२ जागांच्या पाठिंब्यावर राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर आली. काँग्रेस पक्षाच्या आघाडीला १३६ जागा मिळाल्या. कॉग्रेसचा या निवडणूकीत मोठा पराभव झाला आणि त्या पक्षास लोकसभेत ११२ जागा मिळाल्या.

या निवडणूकीतील विजयानंतर अटलबिहारी वाजपेयी यांनी मंत्रीमंडळ निर्माण केले. राम नाईक यांना पेट्रोलियम मेत्री, जॉर्ज फर्नांडीस यांना संरक्षण मंत्री बनविले होते. आता त्यांची पंतप्रधानपदाची तसरी टर्म (खेप) सुरू झाली. यावेळी त्यांच्या नेतृत्वातील सरकारने पूर्ण पाच वर्षे शासन चालविले. इ.स. १९८४, १९८५ नंतर पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करणारे ते पहिले गैर-काँग्रेसी पंतप्रधान होते.

**पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या खेपेतील काही महत्वाच्या योजना-घटना :-**

१३ ऑक्टोंबर १९९९ रोजी अटल बिहारी वाजपेयी यांनी मंत्रीमंडळ बनवून कार्यास सुरूवात केली. पंतप्रधान म्हणून त्यांच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या खेपेस आरंभ झाला. या काळात त्यांनी राबविलेल्या योजना, घडलेल्या ठळक घटना खालीलप्रमाणे :

**१) सर्व शिक्षा अभियान सुरू झाले :–**

पंतप्रधान वाजपेयी यांच्या कार्यकाळत सन २००१ मध्ये सर्व शिक्षा अभियान कार्यरत झाले. ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना उपयुत्क व योग्य शिक्षण देवून (२०१० पर्यंत) शिक्षणाचे सार्वत्रीकरण करणे हे सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्य होते. याशिवाय शालेय व्यवस्थापनात समाजाचा सहभाग घेऊन 'शिक्षणातील सामाजिक, प्रादेशिक व लैंगिक भेद दूर करणे' हेही सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्य होते.

सर्व शिक्षा अभियान सुरू करण्यासाठी ८६ वी घटनादुरूस्ती करण्यात आली. डिसेंबर २००२ मध्ये ८६ व्या घटनादुरूस्तीने भारतीय राज्यघटनेच्या भाग III मध्ये 21A हे नवीन उपकलम जोडझयात आले. संकल्पाव्दारे राष्ट्र स्वत:च्या अनुरूप ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सत्कीचे शिक्षा पुरवेल अशा पद्धतीचे नवीन 20A कलम टाकण्यात आले. मार्गदर्शक तत्वांमधील कलम ४५ मध्ये किंचित सुधारणा करण्यात आली. '६ वर्षाखालील बालकांना शिक्षण मिळण्यासाठी व शिशु काळातील जतन करण्यासाठी तरतूद' असे मुळ कलम होते. त्याऐवजी 'राज्य सर्व बालकांना वयाची ६ वर्षे पूर्ण होईतोवर शिक्षण मिळण्यासाठी व शिशुकाळात जतन करण्यासाठी प्रयत्न करेल, असे करण्यात आले. मुलभूत कर्तव्यांमध्ये कलम 51A मध्ये 'k' उपकलम टाकण्यात आले. '६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना शिक्षणाची संधी मिळणे आई-वडील किंवा पालकांचे कर्तव्य' असे उपकलम जोडण्यात आले.

**२) स्वर्णिम चतुर्भुज योजनेचा शुभारंभ झाला :–**

देशातील चार महानगरांना म्हणजे उत्तरेला दिल्ली, दक्षिणेला चेन्नई, पूर्वेला कलकत्ता आणि पश्चिमेला मुंबई अशा चार महानगरांना रोडांनी जोडण्यासाठी इ.स. २००१ मध्ये ही योजना वाजपेयी सरकारने सुरू केली. या योजनेव्दारे भारतातील सहा व चार पदरी राष्ट्रीय महामार्गाचे निर्माण करून, औद्योगिक, सांस्कृतिक आणि कृषी संबंधित असणाऱ्या चार मोठया महानगरांना राजमार्गाव्दारे जोडणे, हा योजनेचा मुख्य उद्देश होता. जवळपास ६ खरब रुपये खर्च करून २०१२ मध्ये ही चतुर्भुज योजना पूर्ण झाली.

**३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरू झाली (PMGSY) :-**

भारतातील सर्व गावांना बारमाही रस्त्याने जोडण्याच्या उद्देशाने वाजपेयी सरकारने २५ डिसेंबर २००० रोजी ही योजना सुरू केली होती. २५ डिसेंबर २००० पासून (PMGSY) चा पहिला टप्पा सुरू झाला. सर्व १.७८ (१,७८,१८४) गावे बारमाही रत्यांनी जोडणे या टप्प्याचे लक्ष होते. सुरवातीला ही योजना १००% केंद्रपुरस्कृत होती. आतादेखील ती केंद्रपुरस्कृत आहे. परंतु दुसऱ्या टप्प्यासाठी केंद्र : राज्य वाटा ६०:४० असा झाला आहे. तसेच योजनेसाठी पेट्रोलवर जे अतिरीत्क शुल्क आकारले जाते. (Road cess) त्यातील ५० टक्के रक्कम या योजनेसाठी वापरली जाते.

**४) अंत्योदय अन्न योजना सुरू झाली : NSSO (National Sample Survey Office) :-**

यांच्या पाहणीनुसार वाजपेयंीच्या काळहात देशातील ५ टक्के लोकसंख्येला दिवससातून दोन वेळा अन्न मिळणे कठीण झाले होते. त्यामुळे एक कोटी अति गरीब कुटूंबांना (Extreme BPL) लक्ष्य ठेवून डिसेंबर

२००० पासून अंत्योदय अन्न योजना सुरू करण्यात आली होती. या कुटूंबांना अन्नसुरक्षा पुरविण्यासाठी तांदूळ ३ रू. किलो व गहू २ रू. किलो दराने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा कुटूंबाला दरमहा २५ कि.ग्रॅ. अन्नधान्य वरील दराने पुरविले जाई. २००२ नंतर ही मर्यादा दरमहा ३५ कि.ग्रॅ. करण्यात आली. या गटात आता भूमिहीन मजदूर, ग्रामीण कारागिर, सीमांत शेतकरी, विधवा, आजारी व्यक्ती किंवा वृद्ध कुटूंबप्रमुख असलेले कुटूंब लाभार्थी म्हणून गणण्यात येतात.

**५) अन्नपूर्णा योजना :-**

१ एप्रिल २००० ला राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेंतर्गत 'अन्नपूर्णा योजना' सुरू करण्यात आली. या योजनेअन्वये दारिद्रयरेषेखालील असे वृद्ध जे राष्ट्रीय वृद्धांसाठीच्या पेन्शन योजनेचा कोणताही लाभ घेत नाहीत, अशा वृद्धांना प्रतिमाह १० कि.ग्रॅ. अन्नधान्य मोफत देण्याची तरतुद करण्यात आली.

**६) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरू झाली :-**

२५ सप्टेंबर २००१ पासून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरू करण्यात आली. बेरोजगारीचे चक्र मोडणे, मजूरी रोजगार पुरवून अन्नसुरक्षा पुरविणे व ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास करणे या तिहेरी उद्देशाने ही योजना सुरू झाली. मजुरीसोबतच कमीत कमी ५ कि.ग्रॅ. प्रतिव्यक्ती प्रतिदिन अन्नधान्य देण्यास सुरवात झाली.

**७) स्वजलधारा योजना सुरू झाली :-**

ग्रामीण भागातील सर्व खेडयांना स्वच्छ पेयजल पुरविणे, पेयजल स्त्रोत सुस्थितीत राखण्यस मदत करण्याच्या उद्देशाने २५ डिसेंबर २००२ पासून संपूर्ण देशात स्वजलधारा योजना सुरू करण्यात आली. विकेंद्रीकृत स्तरावर ग्रामीण भागातील पेयजलाचा प्रश्न समाप्त करण्याचा निर्णय या योजनेव्दारे करण्यात आला. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात विहीरी व कुपनलिका उभारल्या जात. योजनेचे नियोजन विकेंद्रीत स्वरूपात ग्रामपंचायतीमार्फत राबविले जात होते.

**८) समग्र आवास योजना सुरू करण्यात आली :-**

ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात व एकंदरीत अधिवासात सुधारणा करण्याच्या उद्देशान समग्र आवास योजना १९९९-२००० मध्ये सुरू करण्यात आली. प्रायोगिक तत्वांवर ही योजना २४ राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आली. प्रायोगिक तत्वांवर ही योजना गृहबांधणी, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी या सर्वांचा एकात्तिमक विकास करून अधिवासाच्या शाष्वत विकासासाठी योजना कार्यरत होती.

**९) वाल्मीकी आंबेडकर आवास योजना :-**

ही योजना १५ ऑगस्ट २००१ ला घोषित होवून २ डिसेंबर २००१ पासून लागू करण्यात आली. ही योजना शहरी भागामधील झोपडपट्ट्यांमध्ये रयाहणाऱ्या दारिद्रय रेषेखालील लोकांना निवारा पुरविण्यासाठी सुरू करण्यात आली. या योजनेत केंद्र व राज्याचा वाटा ५०:५० टक्के असा होता.

**१०) राष्ट्रीय महिला सशत्कीकरण धोरण जाहीर केले :-**

महिलांची प्रगती, विकास व सशत्क्रीकरण घडवून आणण्याच्या उद्देशाने २० मार्च २००१ रोजी राष्ट्रीय महिला सशत्कीकरण धोरण जाहीर करण्यात आले. स्त्रीक्षमतांचा विकास होण्यासाठी, आर्थिक व सामाजिक धोरण ठरविणे, स्त्रियांना राजकिय, आर्थिक, सामाजिक, नागरी व सांस्कृतिक हक्क प्राप्त करून देणे, आरोग्य, शिक्षण, रोजगार इत्यांदीमध्ये समान संधी प्राप्त करून देणे. न्यायव्यवस्था बळकट करणे, स्त्री व बालकांवरील भेदभाव व हिंसा दूर करणे असे या धोरणाची उद्दिष्ट्ये आहेत.

**११) दीनदयाल अपंग पुनर्वसन योजना सुरू झाली :-**

अपंगांच्या पुनर्वसनासाठी प्रशिक्षण, नियोजन व आर्थिक तरतुदींसारख्या प्रत्यक्ष कृतीचा आराखडा असलेली दिनदयाल योजना १९९९ मध्ये सुरू करण्यात आली. आधी तिचे नाव 'पुनर्वसन योजना' होते. २००३ मध्ये दिनदयाल हे नाव दिले गेले. अपंग पुनर्वसन व समावेशनासाठी सर्वोच्च योजना (Umbrella Central Sector Scheme) म्हणून दिनदयाल योजना राबविली जात आहे.

**१२) राष्ट्रीय वृद्धांसाठीचे धोरण जाहीर झाले :-**

१९९९ मध्ये वृद्धांना चांगले जीवन जगण्यासाठी प्रयत्न करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय वृद्धांसाठीचे धोरण वाजपेयींच्या सरकारच्या काळात जाहीर करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय वृद्धांचे वर्ष म्हणून साजरे केले. या घटनेला अनुसरून १९९९ मध्ये भारताने राष्ट्रीय वृद्धांसाठीचे धोरण जाहीर केले. या धोरणानुसार वृद्धांचा प्रश्न हा राष्ट्रीय महत्वाचा प्रश्न म्हणून समजला जातो. वृद्ध असुरक्षित व उपेक्षित राहणार नाहीत, अशी हमी यावद्‌दारे देण्यात आली आहे. समाजात वृद्धांच्या विधिवत स्थानाचे सबलीकरण करून त्यांचे उर्वरित आयुष्य शांतता व आदराने व्यतित करण्याचे मार्गदर्शन या धोरणात करण्यात आले आहे.

**१३) जनजातीय कार्य मंत्रालय उभारण्यात आले :-**

अनुसूचित जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने 'सामाजिक न्याय व सबलीकरण' मंत्रालयातून 'स्वतंत्र जनजातीय कार्य मंत्रालय' ऑक्टोंबर १९९९ मध्ये उभारण्यात आले.

**राजकारणातून निवृत्ती (निधन) :-**

अटल बिहारी वाजपेयी २२ मे २००४ पर्यंत भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान होते. २००४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पराभव झाला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले. आणि वाजपेयी यांचे शासन समाप्त झाले. त्यानंतर त्यांनी २००५ पासून राजकारणातून निवृत्ती घेतली.

अटल बिहारी हे राजनेता, कवी, लेखक, पत्रकार म्हणून प्रसिद्ध होते. सतेच आपल्या वाणीने दुसऱ्यांना मंत्रमुग्ध करणारे होते. त्यांनी कविता रचल्या आहेत. त्या फारच प्रसिद्ध आहेत. 'मेरी इक्यावन कविताए; 'श्रेष्ठ कविता', 'नई दिशा-मेन अल्बम विद् जगजीत सिंह, 'क्या खोया क्या पाया' अशा त्या कविता होत. याशिवाय त्यांनी – 'इंडियाज फॉरेन पॉलीसी : न्यु डाइमेंशन; 'नेशलन इंटीग्रेटशन, 'शत्की से शांती,' राजनिती की रपटीली राहे' ह्या प्रमुख पुस्तकांचे लेखन केले. याशिवाय 'संसद मे तीन दशक' या पुस्तकाचे लेखनही त्यांनी केले.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यामुळेच त्यांना 'बांग्लादेश लिबरेशन वॉर हॉनर' ह्या पुरस्काराने २०१५ मध्ये सम्मानित करण्यात आले. २०१५ मध्येच त्यांना देशातील सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' देवून सन्मानित करण्यात आले.

दीर्घ आजाराने दिललीच्या एम्स रूग्णालयात १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. ते अविवाहित होते. २५ डिसेंबर हा त्यांचा जन्म दिवस 'सुशासन दिवस' म्हणून भारतात साजरा केला जातो. त्यांच्या निधनाची वार्ता 'एम्स-च्या मेडीकल बुलेटीनच्या माध्यमातून जाहीर करण्यात आली होती. ९६ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले होते.

**संदर्भ सुची :-**

- डॉ. व्ही.जी.सोमकुवर-समकालीन भारताची निर्मिती (१९५०-२०१९), प्रशांत पब्लिकेशन ३, प्रतापनगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ जळगाव-४२५००१

- डॉ. भा.ल. भोळे – आधूनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर.
- https://en.wikipedia.org
- डॉ. अशोक चौसाळकर – आधूनिक भारतीय राजकीय विचार: प्रवाह आणि अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट, नवा विष्णुमंदिर चौक, पुणे- ४११०३०
- https://www.pmindia.gov.in
- https://britannica.com
- https://navbharattimes.indiatimes.com
- डॉ. अलका देशमुख – लोकशाहीचे बदलते स्वरूप आणि निवडणुकांचे राजकारण, साईनाथ प्रकाशन धरमपेठ नागपूर-१०


Research Hub International Journal